**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

**लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक १८.०८.२०२३**
**इतिवृत्त क्रमांक — ३३**

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक १८.०८.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) :- अध्यक्ष
२) उपआयुक्त( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.

३६०

**संदर्भ :** (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- सफाई - ०१८/प्र.क्र.४६/ सआक, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३.
(२) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३२०४/२०२३ दिनांक २३ मार्च २०२३.
(३) नाशिक मनपा जा.क्र.आस्था/कार्या-२/५१०/२०२३ दिनांक २३.०६.२०२३ रोजीचे मा. शासनाचे मार्गदर्शन घेणेकामी पत्र.
(४) कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्रमांक:-सफाई २०२३/प्र.क्र.४७/सआक दिनांक ७ ऑगष्ट २०२३ रोजीचे पत्र.

आज दिनांक १८.०८.२०२३ रोजीच्या बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थीत असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतुदीबाबत महाराष्ट्र शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सफाई -२०१८/प्र.क्र.४६/सआक,मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजीचा निर्गमीत झालेल्या शासन निर्णयातील काही मुद्दे हे अस्पष्ट,संभ्रम अवस्था निर्माण होणारे किंवा निश्चित करणेस / अंमलबजावणी करणेस कठिण असल्याचे दि.२८.०२.२०२३ रोजीच्या बैठकीत निदर्शनास आल्याने याबाबत निवड समितीने शिफारस केलेनुसार मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने मा. शासनाचे मार्गदर्शन घेणेकामी दि.२३.०६.२०२३ रोजी मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मुंबई यांना पत्र देण्यात आले.परंतु,अद्यापपावेतो मा. शासनाकडील कोणतेही मार्गदर्शन प्राप्त झाले नाही.

तसेच, महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३२०४/२०२३, दिनांक २३ मार्च, २०२३ चे निर्णयानुसार लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सेवानिवृत्त सफाई कामगारांच्या रिक्त पदी वारसा हक्काने नेमणूक करणेस पुढील आदेश होईपावेतो स्थगिती दिलेली आहे. त्यास्तव, वारसा हक्क नियुक्ती प्रकरणे सद्यस्थितीत स्थगित ठेवणेत आलेली आहेत.

तथापि, दरम्यानच्या कालावधीत कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ७ ऑगष्ट २०२३ चे पत्र व्हाट्सॲप प्रणालीव्दारे प्राप्त झाले असुन, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी न्यायालयीन रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ दिनांक १०.०४.२०२३ चे आदेशामध्ये "वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या पात्र वारसांना वारसाहक्काने नियुक्त देण्यापासुन सुट देण्यात आली असुन या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने नियुक्ती देण्यास स्थगिती दिलेली आहे. त्यानुसार, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करावी." असे नमुद आहे.

कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ७ ऑगष्ट २०२३ पत्राबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्याने मा.अतिरीक्तआयुक्त सो. यांनी निर्देशीत केलेनुसार दिवंगत/सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड कमिटीच्या शिफारशीनुसार सेवेत सामावुन घेणेसाठी दिनांक २८.०२.२०२३ रोजीचे बैठकीसमोर सादर करणेत आलेल्या एकूण २१ प्रलंबित प्रकरणांपैकी वाल्मिकी, मेहतर व भंगी प्रवर्गाचे ०९ व इतर अनु.जाती प्रवर्गातील १२ प्रकरणे आजच्या बैठकीसमोर सादर करण्यात आले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.कल्पना कुटे) | (नरेंद्र महाजन) | (प्रतिभा मोरे) | (प्रशांत पाटील) | (लक्ष्मीकांत साताळकर) | (भाग्यश्री बानायत (भा.प्र.से.) |
| संचालक, (घ. व्य. वि.) | मुख्य वित्त व लेखाधिकारी | प्र. मुख्य लेखापरिक्षक | उपआयुक्त (समाजकल्याण ) | उपआयुक्त (प्र.) | अतिरिक्त आयुक्त,सेवा |

प-३८७

उक्त संदर्भिय शासन निर्णय, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील न्यायालयीन रिट याचिका व कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र याबाबत सविस्तर सदर बैठकीत चर्चा करण्यात आली.

१) दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजीचा निर्गमीत झालेल्या शासन निर्णयातील काही मुद्दे हे अस्पष्ट, संभ्रम अवस्था निर्माण होणारे किंवा निश्चित करणेस / अंमलबजावणी करणेस कठिण असल्याने मा. शासनाचे मार्गदर्शन घेणेकामी दि.२३.०६.२०२३ रोजी पत्र देण्यात आले. परंतु,अद्यापपावेतो मा. शासनाकडील कोणतेही मार्गदर्शन नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

२) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल रिट याचिका क्रमांक ३२०४/२०२३ चा निकाल अद्यापपोवेतो झालेला नाही.

३) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील न्यायालयीन रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ दिनांक १०.०४.२०२३ रोजीचा आदेश नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.

४) मा. कार्यासन अधिकारी सो.,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ७ ऑगष्ट २०२३ रोजीचे पत्र अधिकृतरित्या नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

५) दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजीचा निर्गमीत झालेल्या शासन निर्णयानुसार लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसाहक्काने अंमलबजावणी करणेबाबत पुर्वीचे सर्व शासन निर्णय हे अधिक्रमित केलेले आहेत. त्यामुळे दिनांक ७ ऑगष्ट २०२३ रोजीचे पत्रात वाल्मिकी, मेहतर व भंगी प्रवर्गातील दिवंगत/सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड कमिटीच्या शिफारशीनुसार सेवेत सामावुन घेणेसाठी कोणत्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी हे नमुद नाही.

उक्त मुद्येनिहाय बाब ही मा. नियुक्ती प्राधिकरण तथा मा. आयुक्त महोदय यांचेसमोर प्रस्तावाच्या स्वरुपात सादर करुन त्याबाबत मा. आयुक्त महोदय यांचे मत तथा निर्णय अथवा आदेश होणे आवश्यक असल्याने घनकचरा व्यवस्थापन विभागाने याबाबत पुढील कार्यवाही करावी. त्यानंतर प्रस्ताव समितीसमोर सादर करावेत. अशी एकमताने शिफारस करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन, दिलेले निर्देशानुसार कार्यपुर्ती करणेत यावी असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

(डॉ.कल्पना कुटे)
संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,

(नरेंद्र महाजन)
मुख्य वित्त व लेखाधिकारी

(प्रतिभा मोरे)
प्र. मुख्य लेखापरिक्षक

(प्रशांत पाटील)
उपआयुक्त (समाजकल्याण)

(लक्ष्मीकांत साताळकर)
उपआयुक्त (प्र.)

(भाग्यश्री बानायत (भा.प्र.से.)
अतिरिक्त आयुक्त,सेवा

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक